विद्यापीठ ग्रंथालय
डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ,
दापोली–४१५७१२, जि. रत्नागिरी

जा. क्र. डॉबासाकोकृवि/वि.ग्र./जाहिरात/१४४/२०२३ दिनांक : २४/०८/२०२३

# जाहिरात

डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली अंतर्गत विद्यापीठ ग्रंथालयामध्ये निव्वळ तातपुरत्या स्वरुपात खालील प्रमाणे दिलेल्या तपशिलानुसार पद भरण्यासाठी सोबत जोडण्यात आलेल्या नमुन्यामध्ये शैक्षणिक प्रमाणपत्राच्या सत्यप्रतींसह पात्र उमेदवारांकडून **दिनांक ०७ /०९/२०२३** रोजी सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | पदाचे नाव | पदांची संख्या | एकत्रित वेतन | नेमणूकीचा कालावधी |
|---|---|---|---|---|
| १ | कार्यालय सहाय्यक | १ | १२०००/– | ११ महिने |

**आवश्यक शैक्षणिक अर्हता**

| अ. क्र. | पदाचे नाव | शैक्षणिक अर्हता |
|---|---|---|
| १ | कार्यालय सहाय्यक | १) पदवीधर (कला, वाणिज्य, विज्ञान)<br>२) मराठी टायपिंग ३० श. प्र. मि. आणि इंग्रजी टायपिंग ४० श. प्र. मि.<br>३) एम. एस. सीआयटी |

**नियम व अटी :–**

१. वयोमर्यादा :– खुल्या प्रवर्गातील उमेदवारांकरीता अर्जदाराचे वय ३८ वर्ष व आरक्षित प्रवर्गातील उमेदवारांकरीता ४३ वर्ष राहील.
२. उमेदवारांनी विहित प्रपत्रामध्ये पूर्ण तपशिल भरुन अर्ज सादर करावा. अर्ज मा. प्रभारी अधिकारी, विद्यापीठ ग्रंथालय यांचे नावे टपालाने,हातबटवडा अथवा कुरीअर मार्गे दिनांक ०७/०९/२०२३ पर्यंत पोहोचतील अशाप्रकारे पाठविण्यात यावेत. विहित मुदतीनंतर प्राप्त झालेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही.
३. अर्जाच्या लखोटयावर ''कार्यालय सहाय्यक'' या पदासाठी अर्ज असा उल्लेख करावा.
४. पात्र उमेदवारांच्या निवड समितीद्वारे मुलाखती घेण्यात येतील.
५. मुलाखतीला येताना अर्जाला जोडण्यात आलेल्या सर्व प्रमाणपत्रांच्या मुळ प्रती सोबत आणाव्या लागतील.
६. मुलाखतीसाठी बोलावण्यात आलेल्या उमेदवारांना प्रवास तसेच दैनिक भत्ता अनुज्ञेय असणार नाही.
७. निवड झालेल्या उमेदवाराला नेमणूकीच्या आदेशातील सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबतचा करारनामा विहित नमुन्यात रुपये १००/– रक्कमेच्या बॉन्ड पेपरवर लिहून द्यावा लागेल.

८. निवड झालेल्या उमेदवाराला अकरा महिने किंवा प्रकल्पाच्या कालावधीनुसार निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती देण्यात येईल.

९. उमेदवाराला प्रकल्प/योजनेतील नेमणूक पुढे चालू ठेवण्यासाठी तसेच डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोलीच्या नियीमत आस्थापनेवार नियुक्तीसाठी दावा करता येणार नाही.

१०.उमेदवाराला नोकरी सोडून जाण्याची इच्छा असल्यास एक महिन्याची आगाऊ मंजूरी घ्यावी लागेल अन्यथा एक महिन्याचे वेतन भरणा करावे लागेल.

११.उमेदवाराचा अर्ज नाकारण्याचा अधिकार विद्यापीठाकडे आहे.

१२.निवडलेल्या उमेदवारांना विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रामध्ये जेथे योजना कार्यरत आहे तेथे नियुक्ती देण्यात येईल.

१३.कार्यालयाच्या कामकाजाची वेळ ०९.०० ते १७.३० अशी राहिल तथापि,एखादया दिवसाचे काम वाढल्यास काम पूर्ण होईपर्यत थांबावे लागेल याची नोंद घ्यावी.

१४.सुट्टीच्या दिवशी कामाच्या निकडीनुसार उपस्थित रहावे लागेल.तसेच दोन महिन्यांसाठी एक यानुसार किरकोळ रजा देय राहतील. या व्यतिरीक्त रजा हया बिनपगारी करण्यात येतील.

१५.जादा केलेल्या कामाचा कोणताही मेहनताना देण्यात येणार नाही.

१६.काम समाधानकारक न वाटल्यास उमेदवारांच्या सेवा कोणत्याही दिवशी समाप्त करण्याचा अधिकार सबंधीतांना राहील.

१७.सदर तात्पुरती नियुक्ती अकरा महिने कालावधीकरीता राहील. नियुक्तीसाठी प्राधिकारी यांना विशेष परिस्थीतीत कोणत्याही वेळी अशा तात्पुरत्या नियुक्त्या समाप्त करण्याचे अधिकार राहतील.

१८.सर्वोच्च न्यायालयाने निर्धारीत केलेल्या याचिका क्रमांक एसएलपी–५४५३ निर्णयाच्या अनुषंगाने या नियुक्तीवरील उमेदवारास विद्यापीठ सेवेत कायम नोकरी मिळण्याबाबत हक्क राहणार नाही.

१९.कोणत्याही प्रकारचे गैरवर्तन केल्यास उमेदवाराची नेमणूक रद्द होऊ शकते.

२०.कोणत्याही टपाल विलंबास विद्यापीठ जबाबदार राहणार नाही.

२१.लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र नमुना–अ मध्ये अर्जासोबत सादर करावे

२२.नावामध्ये बदल असल्यास गॅझेट (राजपत्र) जोडण्यात यावे.

२३.जन्मतारखेचा पुरावा जोडावा.

२४.प्रमाणपत्रे सत्यप्रतीत/स्वयंसाक्षांकीत असल्यास स्वयंघोषणापत्रासह जोडणे आवश्यक आहे.

२५.अर्जावर उमेदवाराचा पासपोर्ट आकाराचा फोटो चिकटवावा.

प्रभारी अधिकारी
विद्यापीठ ग्रंथालय
डॉ. बा. सा. कोकण कृषि विद्यापीठ, दापोली

प्रत माहितीसाठी व प्रसिध्दीसाठी

प्रभारी अधिकारी, कृषि ज्ञान व्यवस्थापन कक्ष, डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली, जि. रत्नागिरी.

२/– त्यांना कळविण्यात येते की, सदर जाहिरात विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावी.

# अर्जाचा नमुना

फोटो

१) अर्जदाराचे संपूर्ण नाव :

२) जाहिरातीतील ज्या पदासाठी अर्ज करावयाचा आहे त्या पदाचे नांव :

३) योजनेचे नाव :

४) मोबाईल नंबर :

५) ई — मेल :

६) सध्याचा पत्रव्यवहाराचा पत्ता :

७) कायमचा पत्ता :

८) जन्मतारीख (अंक व अक्षरामध्ये) :

९) अर्ज स्विकारण्याच्या अंतीम दिनांकाच्यावेळी असलेले वय : ........... वर्षे, ............ महिने, ............ दिवस

१०) अर्जदाराची जात आणि प्रवर्ग : जात ................ ..... प्रवर्ग ................

११) शैक्षणिक अर्हता

| अ. क्र. | उत्तीर्ण परिक्षेचे नांव | बोर्ड/विद्यापीठ संस्थेचे नांव | उत्तीर्ण झाल्याचे वर्ष | वर्ग/श्रेणी | गुणांची टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| १) | | | | | |
| २) | | | | | |
| ३) | | | | | |

१२) अनुभव :— ................. वर्षे .................... महिने .................... दिवस

| अ. क्र. | नियोक्त्याचे नांव | धारण केलेले पद व वेतनश्रेणी | कालावधी | | | | | हाताळीत असलेल्या कामाचे स्वरूप | नोकरी सोडण्याचे कारण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | पासून (दिनांक) | पर्यंत (दिनांक) | एकूण कालावधी | | | | |
| | | | | | वर्ष | महिने | दिवस | | |
| १) | | | | | | | | | |

१३) इतर —

मी असे लिहून देतो/देते की, वर दिलेली सर्व माहिती बरोबर असून ती सत्य आहे. सदर माहिती खोटी आढळून आल्यास उपरोक्त पदासाठी मी अपात्र होईन याची मला जाणीव आहे.

दिनांक :

ठिकाण :

स्वाक्षरी

टिप : अर्जा सोबत जोडण्यात येणाऱ्या सर्व प्रमाणपत्रांच्या छायांकित प्रती सत्यप्रत केलेल्या असाव्यात. जर प्रमाणपत्रांच्या छायांकित प्रती स्वयंसाक्षांकित केल्या असतील तर शासन निर्णय क्र. प्रसुधा/१६१४/३४५/प्र. क्र. ७१/१८—अ, दिनांक ०९/०३/२०१५ अन्वये विहीत नमुन्यातील स्वयंसाक्षांकनाचे स्वयंघोषणापत्र सोबत सादर करणे आवश्यक आहे.

प्रपत्र-अ

# स्वयंघोषणापत्र

अर्जदाराचा फोटो

मी ------------------------------ श्री. ------------------------------ यांचा मुलगा / मुलगी वय ---- वर्षे, आधार क्रमांक (असल्यास) ------------------------------ व्यवसाय ------------------ राहणार ------------------------------ याद्वारे घोषित करतो / करते की, वरील सर्व माहिती माझ्या व्यक्तीगत माहिती व समजुतीनुसार खरी आहे. सदर माहिती खोटी आढळून आल्यास, भारतीय दंड संहिता अन्वये आणि / किंवा संबंधित कायद्यानुसार माझ्यावर खटला भरला जाईल व त्यानुसार मी शिक्षेस पात्र राहीन याची मला पूर्ण जाणीव आहे.

ठिकाण :------------------

अर्जदाराची सही----------------------

दिनांक :------------------

अर्जदाराचे नाव :----------------------

प्रपत्र–ब

स्वयं-साक्षांकनासाठी स्वयं घोषणापत्र

अर्जदाराचा फोटो

मी-------------------------------श्री. -------------------------------यांचा मुलगा / मुलगी वय-----

वर्ष, आधार क्रमांक (असल्यास) -------------------------------------व्यवसाय-------------------

राहणार------------------------------------- याद्वारे घोषित करतो / करते की, मी स्वयं साक्षांकीत केलेल्या प्रती या मूळ कागदपत्रांच्याच सत्य प्रती आहेत. त्या खोटया असल्याचे आढळून आल्यास, भारतीय दंड संहिता आणि / किंवा संबंधित कायदयानुसार माझ्यावर खटला भरला जाईल व त्यानुसार मी शिक्षेस पात्र राहीन याची मला पूर्ण जाणीव आहे.

ठिकाण :------------------ अर्जदाराची सही-----------------------

दिनांक :------------------ अर्जदाराचे नाव :-----------------------